जा.क्र.प्रा.ना.सं.कें./आस्था/767/२०१८
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,भाटये,
फोन नं. (०२३५२) — २५५०७७
दिनांक : 11 JUN 2018

प्रति,

.......................................
.......................................
.......................................

विषय :— जेवणाचे दरपत्रक पुरविणेबाबत..........

महाशय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविणेत येते की, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये येथे विविध प्रशिक्षण, प्रात्याक्षिक व मेळावा इ. विस्तार कार्यक्रम राबविले जातात. सदर विस्तार कार्यक्रमामध्ये सहभागी शेतकरी व विस्तार कार्यक्रमामध्ये सहभागी मा. मान्यवर, शेतकरी, विस्तार कार्यकर्ते, उदयोजक यांना अल्पोपहार व जेवण देण्यासाठी कृपया खालील तपशीलाप्रमाणे आपली दरपत्रके या कार्यालयाला बंद लखोटयातुन **दिनांक १५/०६/२०१८** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहचतील अशी देण्यात यावीत. बंद लिफाफ्यावर अल्पोपहार व जेवणाचे दरपत्रक असा उल्लेख करावा.

| अ.क्र. | तपशिल | दर | शेरा |
|---|---|---|---|
| १) | **VIP जेवण**<br>२ वाटी सुकी भाजी, १ वाटी पातळ भाजी ( प्रत्येकी १०० ग्रॅम भाजी ) २ भाकरी /३ चपाती, भात ( प्रत्येकी १५० ग्रॅम ), डाळ ( घट्ट १५० मिली), पापड ( प्रत्येकी १ नग ),लोणचे ( प्रत्येकी १५ ग्रॅम ), स्वीट | | सदर जेवण आपण स्वत: सेवा देऊन दयावयाचे आहे. |
| २) | **साधे जेवण**<br>१ वाटी सुकी भाजी, १ वाटी पातळ भाजी ( प्रत्येकी १०० ग्रॅम भाजी ) ३ चपाती, भात ( प्रत्येकी १५० ग्रॅम ), डाळ ( घट्ट १५० मिली), पापड ( प्रत्येकी १ नग ),लोणचे ( प्रत्येकी १५ ग्रॅम ) | — | सदर जेवण आपण स्वत: सेवा देऊन दयावयाचे आहे. |
| ३) | **नाश्ता**<br>पोहे ( प्रत्येकी १५० ग्रॅम )<br>उपमा/शिरा ( प्रत्येकी १५० ग्रॅम )<br>वरिल पैकी १ वजन ( प्रत्येकी १५० ग्रॅम ) | — | सदरचा नाश्ता आपण स्वत: सेवा देऊन पुरवायचा आहे. |
| ४) | **साधा चहा**<br>(प्रत्येकी १०० मिली) | — | सदरचा चहा आपण स्वत: सेवा देऊन दयावयाचा आहे. |
| ५) | **स्पेशल चहा**<br>(प्रत्येकी १०० मिली) | — | सदरचा चहा आपण स्वत: सेवा देऊन दयावयाचा आहे. |

१) खादयपदार्थाची चव उत्तम दर्जाची असावी.
२) नीटनीटकेपणा व साफसफाई असणे आवश्यक आहे.
३) खादयपदार्थात बिघाड झाल्यास देयके पारित केले जाणार नाहीत.
४) गुणवत्ता व दर्जा याबाबतची चाचणी करूनच जेवण पुरवावे लागेल.
५) दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा. छुपे कर असु नयेत.
६) दर भाटये पोच असावेत
७) डाकघरद्वारे दरपत्रक मिळण्यास उशिर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
८) कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियंत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

आपला विश्वासू,

कृषिविद्यावेत्ता,
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,
भाटये,रत्नागिरी

प्रत: प्रसिध्दीसाठी रवाना

१) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी
२) जिल्हा अधिक्षक, कृषि विभाग, रत्नागिरी
३) नगर परिषद कार्यालय, रत्नागिरी
४) ग्रामपंचायत कार्यालय, भाटये, रत्नागिरी

— यांना विनंती करण्यात येते की कृपया सदर निविदा नोटीस आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी.

५) मा.संचालक विस्तार शिक्षण,डॉ.बा.सा.को.कृ.वि,दापोली. यांना विनंती करण्यात येते की वरील निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मिळावी.

६) मा.प्रमुख कृषि ज्ञान माहिती केंद्र akmudbkkv@gmail.com संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

७) प्रा.ना. सं. के. भाटये (कार्यालयीन नोटीस बोर्ड)